

# मेट्रोचा भुयारी मार्ग

**मुंबई :** मेट्रो–३ चे कामकाज प्रचंड मोठ्या वेगात सुरू आहे. कुलाबा–वांद्रे ते सिप्झ अशा या मार्गाचे सुमारे ८०० मीटर लांबीचे भुयारीकरण पूर्ण होत आले आहे. गेल्या १८ महिन्यांपासून हे काम सुरू आहे. जमिनीच्या २५ ते ३० मीटर खाली खोदकाम करून ही मार्गिका तयार करण्यात येत आहे.

▌वृत्त पान ४

# मेट्रो-३ मार्गिकेचे ८०० मीटरचे भुयारी काम पूर्ण

**मुंबई : प्रतिनिधी**

कुलाबा- वांद्रे- सीप्झ मेट्रो-३ या मुंबईतील पहिल्या भुयारी मेट्रो मार्गिकेच्या बांधकामाचे कंत्राट देऊन आता १८ महिने पूर्ण झाले असून या कालावधीमध्ये अनेक महत्वाच्या कामांना गती आली आहे. या मार्गिकेचे सात टप्प्यांमध्ये काम करण्यात येत असून आत्तापर्यंत या संपूर्ण मार्गिकेमध्ये एकूण ८०० मीटर लांबीच्या मार्गिकेचे काम पूर्ण झाले असल्याची माहिती मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्यावतीने देण्यात आली आहे.

मेट्रो-३ मार्गिकेच्या भुयारीकरणासाठी आवश्यक असणाऱ्या टनेल बोरिंग मशिन्स (टीबीएम) शहराच्या विविध भागामध्ये दाखल झाल्या असून अनेक मशिन्सद्वारे प्रत्यक्ष भुयारीकरणाच्या कामालाही सुरूवात झाली आहे. सात टप्प्यांमध्ये एकूण सतरा टीबीएम मशिन्सद्वारे भुयारीकरण करण्यात येणार असून आतापर्यंत सहा टीबीएमच्या सहाय्याने काम सुरू असून लवकरच उर्वरीत टीबीएमही कार्यरत होतील आणि भुयारीकरणाच्या कामाचा वेग आणखी वाढेल, असे एमएमआरसीचे प्रकल्प संचालक एस.के.गुप्ता यांनी सांगितले. तसेच मागील दीडवर्ष प्रकल्पाच्या दृष्टीने फार निर्णायक ठरले. या दरम्यान प्रकल्पासाठी लागणारी जमीन अधिग्रहण करणे, वाहतूक व्यवस्थापनाचा आराखड्याची अंमलबजावणी करणे, स्थानकाचे अंतिम डिझाईन ठरवणे, भूमिगत वाहिन्यांचे स्थानांतरण करणे अशी कामे पूर्ण करण्यात आली असल्याचेही गुप्ता यावेळी म्हणाले.

या मार्गिकेच्या भुयारी मार्गाचे खोदकाम प्रामुख्याने टीबीएमच्या सहाय्याने करण्यात येत असून टीबीएम भूगर्भामध्ये २५-३० मीटर इतके खाली जाऊन खोदकाम करते. जमिनीखाली खडकाळ भागात कुशलतेने काम करणे ही टनेल बोअरिंग मशिनची खासियत आहे. ३३.५ किलोमीटर इतक्या लांब दुहेरी टनेलचे काम करण्यासाठी सात वेगवेगळ्या ठिकाणी ही टीबीएम भूगर्भामध्ये उतरवण्यात येणार आहेत. सध्या दरदिवशी १० मीटरपर्यंत भुयारीकरणाचे काम होत असून लवकरच कामाला गती येणार आहे.



■ संपूर्ण मार्गिकेमध्ये आत्तापर्यंत ६ लाख ३२ हजार ७१६ क्युबीक मीटर जमिनीचे खोदकाम पूर्ण झाले आहे. सातही स्थापत्य पॅकेजेससाठीची कास्टींग यार्डस पूर्णतः कार्यरत झालेली आहेत. प्रकल्पासाठी आवश्यक असणारी ७१ पाईल बोरिंग मशिन्स, ८८ खोदकाम करणाऱ्या मशिन्स कामाच्या ठिकाणी कार्यरत आहेत. एकूण ८०० मीटरपर्यंतचे काम पूर्ण झाले असून सुमारे १८ टक्के काम पूर्ण झाले असल्याचे एमएमआरसीने स्पष्ट केले. प्रकल्पाच्या कंत्राटदारांचे सुमारे १ हजार ८०० कर्मचारी काम करत आहेत, तर ४३० सल्लागार कार्यरत असून यामध्ये ३५ तज्ज्ञ आहेत.